www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Series

**C**

# OCT-12226
# Paper-II
# PHILOSOPHY

Question Booklet Serial No.
प्रश्नपत्रिका अनुक्रमांक

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) .....
   (Name) .....
2. (Signature) .....
   (Name) .....

Seat No. | | | | | | | | |
(In figures as in Admit Card)

Seat No. .....
(In words)

OMR Sheet No. | | | | | | |
(To be filled by the Candidate)

**Time Allowed : 2 Hours]** **[Maximum Marks : 200**

Number of Pages in this Booklet : **32**

Number of Questions in this Booklet : **100**

C

## Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **100** objective type questions. **Each** question will carry **two** marks. **All** questions of Paper II will be **compulsory**.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. **Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.**
   (ii) Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. **Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes.** Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.
   (iii) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example** : where (B) is the correct response.
   (A) ● (C) (D)
   Following wrong methods should not be used as they are not recognised by scanning machine in digitized assessment. Candidate using such method will be responsible for their loss.

| WRONG METHODS |
|---|
| (A) ✓ (C) (D) (A) ✗ (C) (D) (A) ● (C) (D) (A) (B) (C) (D) |

5. Your responses to the items are to be indicated in the OMR Sheet given inside the Booklet only. If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. Use of any calculator or log table, etc., is prohibited.
12. There is no negative marking for incorrect answers.

## विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परीक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या OMR उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **100** बहुविकल्प प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनिटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात :
   (i) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. **स्टीकर सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्वीकारू नये.**
   (ii) पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. **पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/ प्रश्नांचा चुकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी.** त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
   (iii) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पाहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा क्रमांक लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा.** : जर (B) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) ● (C) (D)
   खालील चुकीच्या पद्धती वापरू नये, कारण डिजिटाइज्ड (Digitized) मूल्यांकनात स्कॅनिंग मशीन त्यांना ओळखत नाही. त्या पद्धती वापरून नुकसान झाल्यास त्यास विद्यार्थीच जबाबदार असतील.

| चुकीची पद्धती |
|---|
| (A) ✓ (C) (D) (A) ✗ (C) (D) (A) ● (C) (D) (A) (B) (C) (D) |

5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत**. इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेवर नमूद केलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापि, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.
12. चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.

C

Prepp
Your Personal Exams Guide





Prepp
Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

OCT-12226–C

# Philosophy
## Paper II
## दर्शनशास्त्र
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 120 Minutes]** **[Maximum Marks : 200**

**Note :** This Paper contains **Hundred (100)** multiple choice questions. Each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत **शंभर (100)** बहुविकल्प प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. सर्व प्रश्न सोडवा.

1. For Husserl, what is the wonder of all wonders ?
   (A) Mind
   (B) Intuitions
   (C) Essences
   (D) Subjectivity

2. Things encountered by Dasein in the world are characterized by Heidegger as
   (A) Equipment
   (B) Phenomenological Objects
   (C) Thing-in-itself
   (D) Being-for-itself

3. According to Sartre, man is
   (A) Facticity
   (B) Transcendence
   (C) Facticity and Transcendence
   (D) Facticity without Transcendence

1. ह्यूसेर्लच्या मते, सर्वाधिक विस्मयकारी काय असते ?
   (A) मन
   (B) अंत:स्फूर्ती
   (C) सारतत्त्वे
   (D) विषयीभाव

2. डाझाईनना अनुभव येणाऱ्या जगातील वस्तूंना हायडेगर काय म्हणतात ?
   (A) उपकरणे
   (B) मानसघटनाशास्त्रीय वस्तु
   (C) वस्तुतत्व/स्वस्थसत्ता
   (D) स्वेहतुक सत्ता

3. सार्त्रच्या मते, माणूस हा असतो _____.
   (A) तथ्यात्मकता
   (B) अतीतता
   (C) तथ्यात्मकता व अतीतता
   (D) अतीतताविरहित तथ्यात्मकता

www.prepp.in



4. Dewey's general framework of reality consists in his attempt to
   (A) Disintegrate human knowledge and activity
   (B) Reintegrate human knowledge and activity
   (C) Disintegrate knowledge and reality
   (D) Integrate knowledge, truth and reality

5. In Nietzsche's philosophy, the will to power has its expression in the
   (A) Slave morality
   (B) Master morality
   (C) Master and slave morality
   (D) No morality

6. Which of the following is *not* a cardinal virtue ?
   (A) Wisdom
   (B) Courage
   (C) Temperance
   (D) Goodness

7. In the context of Aristotle, eudaemonia means
   (A) Highest human good
   (B) Only physical pleasure
   (C) Democracy
   (D) Satisfaction of desires

4. ड्युईंच्या वास्तवाच्या सर्वसाधारण चौकहीन त्याच्या नेमक्या कोणत्या प्रयत्नाचा समावेश असतो ?
   (A) मानवी ज्ञान व क्रिया विभाजन
   (B) मानवी ज्ञान व क्रिया पुनरेकात्मीकरण
   (C) ज्ञान व वास्तव विभाजन
   (D) ज्ञान, सत्य व वास्तव त्यांचे एकात्मीकरण

5. नित्शेच्या तत्त्वज्ञानातील सत्तासंपादनाची इच्छा कशात प्रतिबिंबित झाली आहे ?
   (A) गुलाम–नैतिकता
   (B) मालक–नैतिकता
   (C) मालक व गुलाम–नैतिकता
   (D) अ–नैतिकता

6. खालीलपैकी कोणता मुख्य सद्‌गुण **नाही** ?
   (A) शहाणपण
   (B) धैर्य
   (C) संयम
   (D) शुभत्व

7. ॲरिस्टॉटलच्या संदर्भात, सर्वहितवाद म्हणजे
   (A) उच्चतम मानवी शुभ
   (B) केवळ भौतिक सुख
   (C) लोकशाही
   (D) इच्छा समाधान

www.prepp.in



8. The dictum "Duty's for Duty's Sake" belongs to

(A) Kant

(B) Spencer

(C) Moore

(D) Hume

9. "An act or rule of action is right if and only if it promotes at least as great a balance of good over evil" is the view held by

(A) Kant

(B) Mill

(C) Spencer

(D) Hobbes

10. The term "Moral Philosophy" is derived from the term

(A) Magnet

(B) Material

(C) Mortal

(D) Mores

11. According to Robert Nozick, the subject of justice in holdings consists of _____ themes.

(A) Three

(B) Two

(C) Four

(D) Social and political

8. "कर्तव्यासाठी कर्तव्य" हे सूत्र यांचेशी संबंधीत आहे

(A) कांट

(B) स्पेन्सर

(C) मूर

(D) ह्यूम

9. "एखादी कृती किंवा कृतीविषयक नियम तेव्हाच योग्य ठरतो, जेव्हा त्याद्वारे अशुभापेक्षा तौलनिक दृष्ट्या शुभाची निर्मिती अधिक होत असते" हा दृष्टीकोन यांचा आहे _____.

(A) कांट

(B) मिल

(C) स्पेन्सर

(D) हॉब्ज

10. "नैतिक तत्त्वज्ञान" (मॉरल फिलॉसॉफी) हे पद ज्यातून व्युत्पन्न झाले आहे ते पद म्हणजे

(A) मॅग्नेट

(B) मटेरियल

(C) मॉर्टल

(D) मोरस

11. राबर्ट नॉझिकच्या मतानुसार मालमत्तेबाबतचा न्याय या विषयात _____ मुद्दे येतात.

(A) तीन

(B) दोन

(C) चार

(D) सामाजिक व राजकीय

www.prepp.in



12. According to Isaiah Berlin, the positive sense of "liberty" desires from a human beings wish to be his/her own.
(A) Authority
(B) Rational guide
(C) Moral guide
(D) Master

13. The first significant theoretical analysis of women's claim for equal rights has been done by
(A) Simone de Beauvoir
(B) Diana Coole
(C) Simone Veil
(D) Mary Wollstonecraft

14. Which of the following concepts is indispensable for an analysis of gender inequality ?
(A) Gender injustice
(B) Patriarchy
(C) Explicit misogyny
(D) Culture

15. Who among the following denounces the traditional neglect of minority cultures in the Western political tradition ?
(A) Will Kymlicka
(B) Rousseau
(C) John Rawls
(D) Amartya Sen

12. इसाया बर्लिनच्या मते स्वत:च्या/ची _____ होण्याच्या मानवाच्या इच्छेतून "स्वातंत्र्या" चा सकारात्मक अर्थ निष्पन्न होतो.
(A) अधिकारी
(B) बौद्धिक मार्गदर्शक
(C) नैतिक मार्गदर्शक
(D) मालक

13. स्त्रीच्या समान हक्कांसाठीच्या दाव्यांचे प्रथम सार्थ सैद्धांतिक विश्लेषण यांनी केले आहे
(A) सिमॉन-दी-बुवा
(B) डायना कूल
(C) सिमॉन वेल
(D) मैरी वौलस्टोनक्राफ्ट

14. लिंगभावातील असमानतेच्या विश्लेषणाकरिता खालीलपैकी कोणती संकल्पना अपरिहार्य आहे ?
(A) लिंगभावातील अन्याय
(B) पितृसत्ता
(C) उघड स्त्रीद्वेष
(D) संस्कृती

15. पाश्चात्य राजकीय परंपरेत अल्पसंख्यांक संस्कृतीच्या होत असलेल्या पारंपरिक उपेक्षेची निंदा खालीलपैकी कोण करतो ?
(A) विल किम्लीका
(B) रूसो
(C) जॉन रॉल्स
(D) अमर्त्य सेन

www.prepp.in



16. Which of the following does *not* fall in the domain of applied philosophy ?

(A) philosophy of education

(B) philosophical counseling

(C) philosophy of technology

(D) philosophical logic

17. Which of the following statements describes the relationship between technology and technique in the best manner ?

(A) technology and technique are indistinguishable

(B) technology and technique are distinguishable but necessarily linked

(C) technology and technique denote the similar things

(D) technology and technique are indistinguishable and inseparable

18. Which of the following questions may fall in the domain of ethics of information technology ?

(A) is stealing a computer immoral ?

(B) is hacking a computer immoral ?

(C) is sharing information using a computer immoral ?

(D) is expressing negative thoughts using a computer immoral ?

16. खालीलपैकी कोणता विषय उपयोजित नीतिशास्त्राच्या कक्षेत समाविष्ट **नाही** ?

(A) शिक्षणाचे तत्वज्ञान

(B) तात्विक समुपदेशन

(C) तंत्रज्ञानाचे तत्वज्ञान

(D) तात्विक तर्कशास्त्र

17. तंत्रज्ञान आणि तंत्र यांच्यातील संबंध खालीलपैकी कोणत्या विधानातून उत्तम रीतीने व्यक्त होतो ?

(A) तंत्रज्ञान व तंत्र एकमेकांपासून भिन्न नाहीत

(B) तंत्रज्ञान व तंत्र भिन्न असून एकमेकांशी अनिवार्यपणे निगडीत आहेत

(C) तंत्रज्ञान व तंत्र सदृश गोष्टीचा निर्देश करतात

(D) तंत्रज्ञान व तंत्र भिन्नही नाहीत व त्यांना वेगळेही करता येत नाही

18. माहिती तंत्रज्ञानाच्या नीतिशास्त्राच्या कक्षेत खालीलपैकी कोणत्या प्रश्नाचा समावेश होऊ शकतो ?

(A) संगणकाची चोरी करणे अनैतिक आहे का ?

(B) संगणक हॅक करणे अनैतिक आहे का ?

(C) संगणकाचा वापर करून माहिती इतरांना पाठवणे अनैतिक आहे का ?

(D) संगणकाचा वापर करून नकारात्मक विचार व्यक्त करणे अनैतिक आहे का ?

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



19. Environmental ethics in a broad sense, is a sub-division of

(A) biomedical ethics

(B) bioethics

(C) business ethics

(D) professional ethics

20. Which of the following is *not* a foundational ethical assumption in bioethics ?

(A) respect for autonomy

(B) maximization of welfare

(C) social justice

(D) minimization of benefit

21. According to Frege, which of the following has sense and reference ?

(A) Names

(B) Sentences

(C) Names and sentences

(D) Thoughts

22. According to Moore, *Esse Est Percipi* is a representative dictum of

(A) Commonsense Realism

(B) Materialism

(C) Idealism

(D) Naive Realism

19. व्यापक अर्थाने पर्यावरणाचे नीतिशास्त्र खालीलपैकी कशाचा उपविभाग आहे ?

(A) जैव-वैद्यकीय नीतिशास्त्र

(B) जैव नीतिशास्त्र

(C) व्यापार विषयक नीतिशास्त्र

(D) व्यावसायिक नीतिशास्त्र

20. जैव नीतिशास्त्राच्या संदर्भात खालीलपैकी कोणते पायाभूत नैतिक गृहीतक **नाही** असे म्हणता येईल ?

(A) स्वायत्ततेचा आदर

(B) जास्तीत जास्त कल्याणकारकता

(C) सामाजिक न्याय

(D) कमीतकमी फायदेशीरपणा

21. फ्रेगच्या मते, खालीलपैकी कोणास अर्थ व निर्देशन असतात ?

(A) नामे

(B) विधाने

(C) नामे व विधाने

(D) विचार

22. मूरच्या मते, 'अस्तित्व हेच संवेदन' म्हणजे

(A) सर्वसाधारण समजुतींचा वास्तववाद

(B) भौतिकवाद

(C) चिद्वाद

(D) भाबडा वास्तववाद

www.prepp.in



23. According to Ayer, the most important identity marker of Philosophy is

(A) Philosophical Method

(B) Philosophical Problems

(C) Philosophical Theories

(D) Empirical Approach

24. According to Ryle, the term 'carnivorous cows' in the expression 'carnivorous cows do not exist' refers to a

(A) Subject

(B) Predicate

(C) Verb

(D) Non-real entities

25. According to Later Wittgenstein, Cartesian doubt is a

(A) Violation of rules of language

(B) Genuine universal doubt

(C) Extension of rules of language

(D) Method to arrive at certainty

26. Which of the following is *not* a characteristic of an Axiomatic System ?

(A) Consistency

(B) Completeness

(C) Soundness

(D) Independence

23. एयरच्या मते, तत्त्वज्ञानाची सर्वात महत्वाची खूण म्हणजे

(A) तत्त्वज्ञानपद्धती

(B) तत्त्वज्ञानात्मक समस्या

(C) तत्त्वज्ञानात्मक उपपत्ती

(D) आनुभविक दृष्टिकोण

24. राइलच्या मते, 'मांसभक्षक गायी नसतात' ह्या शब्दसंहतीतील 'मांसभक्षक गायी' ही संज्ञा कोणाबाबत आहे ?

(A) उद्देश्य

(B) विधेय

(C) क्रियापद

(D) अ–वास्तविक पदार्थ

25. उत्तरकालीन विट्गेन्स्टाइननुसार, कार्तेशिअन संशय कसा असतो ?

(A) भाषेचे नियम मोडणारा

(B) अस्सल वैश्विक संशय

(C) भाषेच्या नियमांचे विस्तारूप

(D) शाश्वतीसाठीची पद्धती

26. पुढीलपैकी कोणते बीजानुमान प्रणालीचे वैशिष्ट्य **नाही** ?

(A) सुसंगतता

(B) संपूर्णता

(C) उचितता

(D) स्वतंत्रता

www.prepp.in



27. Which of the following is *not* a decision procedure ?
(A) Truth-table-method
(B) Shorter-truth-table-method
(C) Truth-tree method
(D) Dilemma

28. Which Law of thought states 'A is A' ?
(A) Law of Identity
(B) Law of Non-contradiction
(C) Law of Excluded Middle
(D) Law of Material Implication

29. By using the given symbols in the bracket, correct symbolization of the following statement is : (Mx, Px, Tx)
"All members are either parents or teachers".
(A) (x) [Mx ⊃ (Px · Tx)]
(B) (x) [Mx · (Px ⊃ Tx)]
(C) (x) [Mx ⊃ (Px ∨ Tx)]
(D) (x) [Mx · (Px · Tx)]

30. Identify the fallacy committed in the following argument :
"If Locke is a rationalists, then Hume is also rationalists. Locke is not a rationalists. Therefore, Hume is also not a rationalists."
(A) Fallacy of Division
(B) Fallacy of composition
(C) Fallacy of affirming the consequent
(D) Fallacy of denying the antecedent

27. पुढीलपैकी कोणती निर्णयपद्धती **नाही** ?
(A) सत्यता–कोष्टक–पद्धती
(B) लघु–सत्यता–कोष्टक–पद्धती
(C) सत्यता–वृक्ष–पद्धती
(D) उभयापत्ती

28. 'A हा A आहे' असे प्रतिपादन करणारा विचाराचा नियम आहे
(A) तादात्म्याचा नियम
(B) अ–व्याधाताचा नियम
(C) वर्जित मध्यतेचा नियम
(D) वास्तविक व्यंजनाचा नियम

29. कंसात दिलेल्या चिन्हांच्या आधारे पुढील विधानाचे अचूक चिन्हांकन आहे: (Mx, Px, Tx)
"सर्व सदस्य एकतर पालक आहेत किंवा शिक्षक आहेत."
(A) (x) [Mx ⊃ (Px · Tx)]
(B) (x) [Mx · (Px ⊃ Tx)]
(C) (x) [Mx ⊃ (Px ∨ Tx)]
(D) (x) [Mx · (Px · Tx)]

30. पुढील युक्तिवादात झालेला तर्कदोष ओळखा :
"जर लॉक हा बुद्धिवादी असेल, तर ह्यूम सुद्धा बुद्धिवादी आहे. लॉक हा बुद्धिवादी नाही. म्हणून ह्यूम सुद्धा बुद्धिवादी नाही."
(A) विभाजन तर्कदोष
(B) समूहाभास तर्कदोष
(C) उत्तरांग स्वीकार तर्कदोष
(D) पूर्वांग निषेध तर्कदोष

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



31. According to Anaximenes the primary air is regulated by the opposite principles of
(A) Darkness and light
(B) Water and fire
(C) Rarefication and condensation
(D) Contraction and expansion

32. Which of the following is *not* the view of Gorgias ?
(A) Nothing exists
(B) Even if existence exists, it cannot be known
(C) Even if existence exists, something can be known
(D) Even if it could be known, it cannot be communicated

33. Plato's theory of form was his answer to which of the following ?
(A) Skepticism of sophists
(B) Socratic egoism
(C) Dualism
(D) The question of meaning of life

34. Which of the following is the most appropriate description of Aristotle's concept of God ?
(A) Pure form and perfect potentiality
(B) Pure matter and perfect potentiality
(C) Pure form and perfect actuality
(D) Pure matter and perfect actuality

31. ॲनॅक्झिमेनीसच्या मते मूलतत्व वायू चे नियमन _____ या विरोधी तत्वांनी केले जाते.
(A) अंधार आणि प्रकाश
(B) जल आणि अग्नी
(C) विरलीकरण आणि घनीकरण
(D) आकुंचन आणि प्रसारण

32. पुढीलपैकी कोणते मत गॉर्गियासचे **नाही** ?
(A) काहीच अस्तित्वात नाही
(B) जरी अस्तित्व अस्तित्वात असले तरी ते जाणता येत नाही
(C) जरी अस्तित्व अस्तित्वात असले तरी काही तरी जाणता येते
(D) जरी ते अस्तित्व जाणता आले, तरी ते संप्रेषित करता येत नाही

33. प्लेटोची आकार ची उपपत्ति पुढीलपैकी कोणाला दिलेले उत्तर आहे ?
(A) सोफिस्टांचा संशयवाद
(B) सॉक्रेटिसचा स्वार्थवाद
(C) द्वैतवाद
(D) जीवनाच्या अर्थासंबंधी प्रश्न

34. ॲरिस्टॉटलच्या ईश्वराच्या संकल्पने संबंधी पुढीलपैकी कोणते वर्णन सर्वात योग्य आहे ?
(A) शुद्ध आकार आणि पूर्ण शक्यता
(B) शुद्ध द्रव्य आणि पूर्ण शक्यता
(C) शुद्ध आकार आणि पूर्ण वास्तविकता
(D) शुद्ध द्रव्य आणि पूर्ण वास्तविकता

www.prepp.in



35. St. Thomas Aquinas gives how many proofs for the existence of God ?

(A) Two

(B) Seven

(C) Three

(D) Five

36. Pātañjala yoga insists on the performance of

(A) Any action what so ever

(B) Action

(C) Devoted action

(D) Disinterested action

37. Transmitting knowledge is a way to repay

(A) Devaṛṇa/debt to Gods

(B) ṚsṬṛṇa/Gururṇa/debt of sages

(C) Pitṛṛṇa/debt of forefathers

(D) Nisargaṛṇa/debt of nature

38. Lord ShriKrishna asks Arjuna, in the Bhagavad-gītā, to perform karma having an eye on

(A) Society

(B) Lokasaṅgraha

(C) Dharmakṣetra

(D) Kurukṣetra

35. सेंट थॉमस ॲक्वानयस यांनी ईश्वराच्या अस्तित्वाच्या सिद्धीसाठी किती युक्तिवाद दिले आहेत ?

(A) दोन

(B) सात

(C) तीन

(D) पाच

36. पातंजलयोगात कशाचा आग्रह धरला जातो ?

(A) कोणतीही क्रिया

(B) क्रिया

(C) सश्रद्ध क्रिया

(D) निष्काम क्रिया

37. ज्ञान संक्रमित करून कोणते ऋण फेडले जाते ?

(A) देवऋण

(B) ऋषीऋण

(C) पितृऋण

(D) निसर्गऋण

38. भगवान श्रीकृष्ण भगवद्गीतेत अर्जुनाला सांगतात की कर्म करावयाचे ते काय पाहून करावयाचे ?

(A) समाज

(B) लोकसंग्रह

(C) धर्मक्षेत्र

(D) कुरुक्षेत्र

www.prepp.in



39. Keeping in mind yoga-sūtras, select the correct order.

(A) Savicāra, Savitarka, Sānanda, Sāsmita

(B) Savicāra, Savitarka, Sāsmita, Sānanda

(C) Savitarka, Savicāra, Sāsmita, Sānanda

(D) Savitarka, Savicāra, Sānanda, Sāsmita

40. Jīva attains the kārmik body due to two kinds of bondage, which are

(A) Dravyabandha and Bhāvabandha

(B) Tattvabandha and Bhāvabandha

(C) Jīvabandha and Bhāvabandha

(D) Jīvabandha and Ajīvabandha

41. The duties pertaining to varnashrama in ancient India were determined by

(A) State

(B) God

(C) Individual

(D) Social customs and traditions

39. योगसूत्रे लक्षात घेऊन योग्य पर्याय निवडा.

(A) सविचार, सवितर्क, सानंद, सास्मित

(B) सविचार, सवितर्क, सास्मित, सानंद

(C) सवितर्क, सविचार, सास्मित, सानंद

(D) सवितर्क, सविचार, सानंद, सास्मित

40. कर्मयुक्त शरीर धारण केलेल्या जीवाला दोन प्रकारचे बंधकत्व असते

(A) द्रव्यबंध व भावबंध

(B) तत्त्वबंध व भावबंध

(C) जीवबंध व भावबंध

(D) जीवबंध व अजीवबंध

41. प्राचीन भारतीय परिप्रेक्ष्यात वर्णाश्रमा संबंधीच्या कर्तव्यांचे नियमन _____ मार्फत होत असे.

(A) राज्य

(B) ईश्वर

(C) व्यक्ती

(D) सामाजिक रूढी व परंपरा

www.prepp.in



42. What according to Gandhi is the difference between passive resistance and satyagraha ?

(A) passive resistance may not always adhere to truth, whereas satyagraha always insists upon truth

(B) passive resistance never takes resort to violence, satyagraha may do so if required

(C) passive resistance and satyagraha are synonymous terms

(D) passive resistance is considered to be the weapon of the strong, satyagraha is not

43. According to Bhishma, the foremost duty of the subjects of a State is

(A) Consecration of a ruler

(B) Maintaining the law and order

(C) Securing one's property

(D) Enjoying the family life

44. According to Bhishma, the Kshatriyas, engaged in constant violence, are purified by

(A) Sacrifices and gifts

(B) Sacrifices and pilgrimages

(C) Sacrifices and confessions

(D) Pilgrimages and gifts

42. गांधींच्या मते निष्क्रिय प्रतिकार व सत्याग्रह यांच्यातील फरक काय ?

(A) निष्क्रिय प्रतिकारात नेहमीच सत्याचे पालन असेलच असे नाही, पण सत्याग्रहात नेहमीच सत्याचा आग्रह असतो

(B) निष्क्रिय प्रतिकारात हिंसेचा कधीच अवलंब केला जात नाही, पण सत्याग्रहात आवश्यकता असल्यास ते केले जाते

(C) निष्क्रिय प्रतिकार व सत्याग्रह हे समानार्थी आहेत

(D) निष्क्रिय प्रतिकार हे सबळांचे शस्त्र मानले जाते पण सत्याग्रह नाही

43. भीष्मांच्या मतानुसार राज्यातील प्रजेचे सर्वात महत्त्वाचे कर्तव्य म्हणजे

(A) राजाप्रती समर्पितभाव

(B) कायदा व सुव्यवस्था राखणे

(C) स्वत:च्या मालमत्तेचे रक्षण करणे

(D) कौटुंबिक आयुष्याचा आनंद घेणे

44. भीष्मांच्या मतानुसार सतत हिंसेमध्ये गुंतलेल्या क्षत्रियांचे शुद्धीकरण _____ यांच्यामुळे होते.

(A) यज्ञ व दान

(B) यज्ञ व तीर्थयात्रा

(C) यज्ञ व पापाची कबुली

(D) तीर्थयात्रा व दान

www.prepp.in



45. According to Kamandaka, humankind is basically interested in the pursuit of

(A) Wealth

(B) Pleasure

(C) Power

(D) Morality

46. According to Swami Vivekananda, Absolute becomes the universe by passing through

(A) Space, Time and Motion

(B) Space, Time and Causation

(C) World, Motion and Causation

(D) Universe, Motion and Causation

47. Which of the following is *not* maintained by Iqbal ?

(A) God has chosen us as his representative

(B) We are trustee of free personality

(C) The ego cannot remain in complete isolation; it needs the world

(D) Each ego is windowless monad

45. कामंदकाच्या मतानुसार मानवजातीला मूलतः _____ याच्या पाठपुराव्यात रस असतो.

(A) संपत्ती

(B) सुख

(C) सत्ता

(D) नैतिकता

46. स्वामी विवेकानंदांच्या म्हणण्यानुसार, केवलतत्त्व जेव्हा जगद्रूप होते, तेव्हा कशातून जाते ?

(A) दिक्, काल व गती

(B) दिक्, काल व कार्यकारणभाव

(C) दुनिया, गती व कार्यकारणभाव

(D) जग, गती व कार्यकारणभाव

47. खालीलपैकी कोणते मत इक्बालने मांडलेले **नाही** ?

(A) ईश्वराने आपल्याला प्रतिनिधि म्हणून निवडले आहे

(B) आपण मुक्त व्यक्तिमत्वाचे विश्वस्त आहोत

(C) स्व सर्वस्वी एकटा राहू शकत नाही; त्याला दुनियेची गरज असते

(D) प्रत्येक स्व गवाक्षहीन चिदणू असतो

www.prepp.in



48. Tagore and Radhakrishnan, taking recourse to tradition propounded

(A) Atheism

(B) Humanism

(C) Scepticism

(D) Agnosticism

49. Which of the following are academic philosophers ?

(A) Mahatma Gandhi, Iqbal and Aurobindo

(B) Iqbal, K. C. Bhattacharya and J. Krishnamurti

(C) Iqbal, K. C. Bhattacharya and S. Radhakrishnan

(D) Mahatma Gandhi, Iqbal and S. Radhakrishnan

50. K. C. Bhattacharya conceives Philosophy as the self-evident elaboration of the

(A) Self-transcending Reality

(B) Self-evident

(C) Self

(D) "Noumenal Self"

48. परंपरेचा आधार घेत टागोर व राधाकृष्णन यांनी कोणता सिद्धांत मांडला ?

(A) निरीश्वरवाद

(B) मानववाद

(C) संशयवाद

(D) अज्ञेयवाद

49. खालीलपैकी कोणते तत्त्वज्ञ अकादमीय होत ?

(A) महात्मा गांधी, इक्बाल व श्रीअरविंद

(B) इक्बाल, के. सी. भट्टाचार्य व जे. कृष्णमूर्ती

(C) इक्बाल, के. सी. भट्टाचार्य व स. राधाकृष्णन

(D) महात्मा गांधी, इक्बाल व स. राधाकृष्णन

50. के. सी. भट्टाचार्यांच्या संकल्पनेनुसार तत्त्वज्ञान म्हणजे कशाचे स्वयंसिद्ध विवेचन होय ?

(A) स्व-अतीत वास्तव

(B) स्वयंसिद्ध

(C) स्व

(D) "नॉमिनल स्व"

www.prepp.in



51. According to the traditional classification, Āstika darśanas are those which accept
(A) the existence of God
(B) the authenticity of the Vedas
(C) rebirth and other worlds
(D) only this world and this life

52. According to Māṇḍūkya-upaniṣad different states of ātman are expressed by the word 'Om' which consists of the letters 'a', 'u' and 'm'. The Turīya state of ātman is expressed by
(A) a
(B) u
(C) all the three letters
(D) no letter

53. "Red colour arises when betel leaf is chewed with other ingredients of Paan" this metaphor was used
(A) by Cārvākas to explain how one should enjoy life
(B) by Sāṅkhyas to explain how the world arises from the combination of Prakṛti and Puruṣa
(C) by Cārvākas to explain how consciousness arises from the combination of four material elements
(D) by Buddhists to explain how an effect arises from the totality of causes and conditions

51. पारंपरिक वर्गीकरणानुसार आस्तिक दर्शने ती आहेत, की जी स्वीकारतात
(A) ईश्वराचे अस्तित्व
(B) वेदांचे प्रामाण्य
(C) पुनर्जन्म आणि परलोक
(D) फक्त हे जग आणि हे जीवन

52. मांडूक्य उपनिषदानुसार 'अ', 'उ', 'म्' या अक्षरांनी बनलेल्या 'ओम्' या शब्दाने आत्म्याच्या वेगवेगळ्या अवस्था व्यक्त केल्या जातात. आत्म्याची 'तुरीय' अवस्था व्यक्त केली जाते _____.
(A) 'अ' या अक्षराने
(B) 'उ' या अक्षराने
(C) तीनही अक्षरांनी
(D) कोणत्याच अक्षराने नव्हे

53. "विड्याचे पान जेव्हा पानाच्या इतर घटकां-बरोबर चघळले जाते तेव्हा लाल रंग उत्पन्न होतो" हे रूपक
(A) आयुष्याचा उपभोग कसा घेतला पाहिजे ते स्पष्ट करण्यासाठी चार्वाकांनी वापरले
(B) प्रकृति आणि पुरुष यांच्या एकत्रीकरणातून जग कसे निर्माण होते ते स्पष्ट करण्यासाठी सांख्यांनी वापरले
(C) चार महाभूतांच्या एकत्रीकरणातून चैतन्य कसे निर्माण होते ते स्पष्ट करण्यासाठी चार्वाकांनी वापरले
(D) हेतु-प्रत्यय यांच्या सामग्रीतून कार्य कसे निर्माण होते ते स्पष्ट करण्यासाठी बौद्धांनी वापरले

www.prepp.in



54. Match the pairs.

| The school of Buddhism | Philosophical position |
|---|---|
| 1. Mādhyamika | a. External objects exist and can be known directly |
| 2. Yogācāra | b. External objects exist but can only be inferred |
| 3. Sautrāntika | c. Consciousness alone exists |
| 4. Vaibhāṣika | d. Everything is without own nature |

Choose among the following options.

(A) 1 – d 2 – c 3 – b 4 – a

(B) 1 – c 2 – d 3 – a 4 – b

(C) 1 – b 2 – c 3 – a 4 – d

(D) 1 – b 2 – a 3 – c 4 – d

55. With respect to the five-fold classification of knowledge in Jainism, the following have been accepted as Pratyakṣa and others as Parokṣa

(A) Mati

(B) Mati, Avadhi and Manaḥparyāya

(C) Kevala

(D) Avadhi, Manaḥparyāya and Kevala

54. जोड्या जुळवा.

| बौद्ध दर्शन संप्रदाय | तात्विक भूमिका |
|---|---|
| 1. माध्यमिक | a. बाह्यार्थ अस्तित्वात असतात आणि ते प्रत्यक्षाने कळू शकतात |
| 2. योगाचार | b. बाह्यार्थ अस्तित्वात असतात पण त्यांचे फक्त अनुमान करता येते |
| 3. सौत्रान्तिक | c. फक्त जाणीव अस्तित्वात असते |
| 4. वैभाषिक | d. प्रत्येक गोष्ट स्वभावरहित असते |

खाली दिलेल्यांतून पर्याय निवडा.

(A) 1 – d 2 – c 3 – b 4 – a

(B) 1 – c 2 – d 3 – a 4 – b

(C) 1 – b 2 – c 3 – a 4 – d

(D) 1 – b 2 – a 3 – c 4 – d

55. जैनदर्शनातील ज्ञानाच्या पंचविध वर्गीकरणाच्या बाबतीत खालील प्रकारची ज्ञाने प्रत्यक्ष म्हणून स्वीकारली आहेत व बाकीची परोक्ष म्हणून स्वीकारली आहेत

(A) मति

(B) मति, अवधि आणि मन:पर्याय

(C) केवल

(D) अवधि, मन:पर्याय आणि केवल

www.prepp.in



56. The statement "You are not punished for stealing sheep, but in order that sheep may not be stolen", is related to

(A) The Deterrent theory

(B) Reformative theory

(C) The Retributive theory

(D) Capital punishment

57. "It is better to be a dissatisfied Socrates than to be a satisfied pig" is a view of

(A) Bentham

(B) Mill

(C) Spencer

(D) Sidgwick

58. _____ holds that one is always to do what will promote his own greatest good.

(A) Materialism

(B) Spiritualism

(C) Ethical Egoism

(D) Ethical prescriptivism

59. An analytical study of meaning, nature and the functions performed by moral languages and concepts is

(A) Normative Ethics

(B) Meta-Ethics

(C) Applied Ethics

(D) Virtue ethics

56. "मेंढीची चोरी केली आहे म्हणून तुला शिक्षा करण्यात आलेली नाही, परंतू तू मेंढी चोरू नये म्हणून करण्यात आली आहे", या विधानाचा संबंध याचेशी आहे

(A) प्रतिबंधात्मक सिद्धांत

(B) सुधारणावादी सिद्धांत

(C) प्रतिशोधात्मक सिद्धांत

(D) देहदंड

57. "संतुष्ट वराह असण्यापेक्षा असंतुष्ट वराह असणे कधीही चांगले" हा यांचा दृष्टीकोन आहे

(A) बेंथम

(B) मिल

(C) स्पेन्सर

(D) सिज्विक

58. स्वत:चे अधिकाधिक शुभ निर्माण होईल तेच व्यक्तीने करावे हे मत _____ चे आहे.

(A) भौतिकवाद

(B) चैतन्यवाद

(C) नीतिशास्त्रीय स्वार्थवाद

(D) नीतिशास्त्रीय आदेशवाद

59. नैतिक भाषा आणि संकल्पनांचे अर्थ, स्वरूप आणि त्याद्वारे करण्यात येणारे कार्य यांचे विश्लेशणात्मक अध्ययन म्हणजे

(A) आदर्शी नीतिशास्त्र

(B) अधिनीतिशास्त्र

(C) उपयोजित नीतिशास्त्र

(D) सद्गुण नीतिशास्त्र

www.prepp.in



60. _____ are emotivist philosophers.

(A) Moore and Ayer

(B) Ayer and Stevenson

(C) Stevenson and Hare

(D) Hare and Nowel-Smith

61. According to Plato, the growth of State needs to be compatible with

(A) The four classes

(B) The philosopher ruler

(C) Totality

(D) Unity

62. Locke's political philosophy starts with the claim that human beings are, by nature one another's

(A) Equals

(B) Unequals

(C) Compatriots

(D) Slaves

63. Marx transformed the Hegelian conflict between ideas into

(A) North-South divide

(B) Capitalist society

(C) Cultural antagonisms

(D) Social wars

60. भावनिकवादी तत्त्वज्ञ हे होत

(A) मूर आणि एयर

(B) एयर आणि स्टिव्हंसन

(C) स्टिव्हंसन आणि हेयर

(D) हेयर आणि नॉवेल–स्मिथ

61. प्लेटोच्या मते, राज्याचा विकास _____ याच्याशी सुसंगत असला पाहिजे.

(A) चार वर्ग

(B) तत्वज्ञ राज्यकर्ता

(C) समष्टि

(D) एकता

62. लॉकच्या राजकीय तत्वज्ञानाचा आरंभ या दाव्याने होतो की मानवप्राणी हे स्वभावत: च एकमेकाचे किंवा एकमेकाशी

(A) समान असतात

(B) असमान असतात

(C) देशबन्धू असतात

(D) दास असतात

63. हेगेलप्रणीत कल्पनांमधील संघर्षाचे परिवर्तन मार्क्स _____ यात करतो.

(A) उत्तर–दक्षिण विभागणी

(B) भांडवलशाही समाज

(C) सांस्कृतिक परस्पर विरोध

(D) सामाजिक युद्धे

www.prepp.in



64. Who among the following philosophers argues that human beings are equal in certain sorts of moral ability ?
(A) John Locke
(B) Bernard Williams
(C) John Rawls
(D) Charles Taylor

65. Rawls is of the view that the principle of utility is _____ with the conception of social cooperation among equals.
(A) Homogenous
(B) Proportionate
(C) Incompatible
(D) Compatible

66. If "Perception is the only source of knowledge" then
(A) Pleasure is the only goal of life
(B) Pleasure and pains are impossible
(C) Pleasures are natural
(D) Pleasures are inevitable

67. Distinction between "need to kill" and "will to kill" is maintained by
(A) J. Krishnamurti
(B) B. R. Ambedkar
(C) K. C. Bhattacharya
(D) M. N. Roy

64. काही प्रकारच्या नैतिक क्षमतेच्या बाबतीत मानव समान असतात असा युक्तिवाद खालीलपैकी कोणता तत्वज्ञ करतो ?
(A) जॉन लॉक
(B) बर्नार्ड विलियम्स
(C) जॉन रॉल्स
(D) चार्ल्स टेलर

65. रॉल्सचा असा दृष्टिकोन आहे की उपयोगितेचे तत्व समानांमधील सामाजिक सहकार्याच्या संकल्पनेशी _____ असते.
(A) सजातीय
(B) प्रमाणशीर
(C) विसंगत
(D) सुसंगत

66. "प्रत्यक्ष हे एकमेव प्रमाण" असल्याने
(A) सुख/काम हे जीवनाचे एकमेव उद्दिष्ट असते
(B) सुखदु:ख अशक्य असतात
(C) सुखे स्वाभाविक असतात
(D) सुखे अटळ असतात

67. "मारण्याची गरज" व "मारण्याची इच्छा" ह्या दोहोतील भेद कोणी स्पष्ट केला ?
(A) जे. कृष्णमूर्ती
(B) भी. रा. आंबेडकर
(C) के. सी. भट्टाचार्य
(D) एम. एन. रॉय

www.prepp.in



68. Buddhism is characterized by the concepts of

(A) Bikkhu and Sangha

(B) Rationality and Society

(C) Dharma and Neeti

(D) Law of Karma and Rebirth

69. Which of the following is *not* a "Yama" stated by Patañjali ?

(A) Ahiṁsā

(B) Satya

(C) Styāna

(D) Asteya

70. The concept of Niṣkāma Karma is like

(A) Kant's deontological ethics

(B) Mill's utilitarianism

(C) Nietzsche's Eternal Recurrence

(D) Bentham's hedonism

71. Choiceless awareness, as maintained by J. Krishnamurti is

(A) Non-judgemental

(B) Imagination

(C) Chimera

(D) Utopia

68. बौद्धमताच्या वैशिष्ट्यपूर्ण संकल्पना म्हणजे

(A) भिक्खू व संघ

(B) बुद्धिप्रामाण्य व समाज

(C) धर्म व नीती

(D) कर्मसिद्धांत व पुनर्जन्म

69. खालीलपैकी कोणाचा समावेश पतंजलीमुनींनी "यमात" केलेला **नाही** ?

(A) अहिंसा

(B) सत्य

(C) स्त्यान

(D) अस्तेय

70. 'निष्काम कर्म' ही संकल्पना कशासारखी आहे ?

(A) कांटचे कर्तव्यवादी नीतिशास्त्र

(B) मिलचा उपयुक्ततावाद

(C) नित्शेचे चिरंतन पुनरावर्तन

(D) बेंथमचा सुखवाद

71. निवडरहित जाणीव, जे. कृष्णमूर्तींच्या मते, कशी असते ?

(A) अनिर्धारणात्मक

(B) कल्पनात्मक

(C) असंभवात्मक

(D) आदर्शयुक्त कल्पना

www.prepp.in



72. Sree Narayana Guru was an architect of

(A) Religious renaissance

(B) Spiritual and social renaissance

(C) Only spiritual renaissance

(D) Only social renaissance

73. In the context of Gandhi, the term 'Satyagraha' does *not* include

(A) Civil Disobedience

(B) Attack

(C) Fasting

(D) Boycotting

74. "Chiti" in Pandit Deendayal Upadhyaya's Philosophy is

(A) Individual consciousness

(B) National consciousness

(C) Spiritual consciousness

(D) Cultural consciousness

75. In his book "Sarvajanik Satyadharma Pustak", Mahatma Phule

(A) Reformed Hinduism

(B) Formed a new religion

(C) Promoted equality of all religions

(D) Advocated Christianity

72. श्रीनारायण गुरु हे _____ याचे शिल्पकार होते.

(A) धार्मिक प्रबोधन

(B) आध्यात्मिक व सामाजिक प्रबोधन

(C) केवळ आध्यात्मिक प्रबोधन

(D) केवळ सामाजिक प्रबोधन

73. गांधींच्या संदर्भात 'सत्याग्रह' या संज्ञेत याचा समावेश होत **नाही**

(A) सविनय कायदेभंग

(B) हल्ला

(C) उपोषण

(D) बहिष्कार

74. पं. दीनदयाल उपाध्याय यांच्या तत्त्वज्ञानातील "चीती" म्हणजे

(A) व्यक्तिचेतना

(B) राष्ट्रचेतना

(C) आध्यात्मिक चेतना

(D) सांस्कृतिक चेतना

75. "सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक" या आपल्या ग्रंथात महात्मा फुले यांनी

(A) हिंदु धर्मात सुधारणा केल्या

(B) नवीन धर्माची स्थापना केली

(C) सर्वधर्म समानतेचा पुरस्कार केला

(D) ख्रिश्चनधर्माचा पुरस्कार केला

www.prepp.in



76. The two fundamental ethical values that support the acceptance of euthanasia are

(A) freedom and wellbeing

(B) autonomy and freedom

(C) autonomy and wellbeing

(D) autonomy and sanctity of life

77. The belief in non-instrumental value of natural systems is known as

(A) anthropocentrism

(B) ecocentrism

(C) psychocentrism

(D) theocentrism

78. Which of the following is true in the context of environmental ethics ?

(A) different entities in nature must have the same instrumental value

(B) different entities in nature may have different instrumental value

(C) economic value is different from instrumental value

(D) scientific value is different from instrumental value

76. खालीलपैकी कोणती मूलभूत नैतिक मूल्ये इच्छामरणाच्या स्वीकार्यतेसाठी आधारभूत आहेत ?

(A) स्वातंत्र्य व कल्याण

(B) स्वायत्तता व स्वातंत्र्य

(C) स्वायत्तता व कल्याण

(D) स्वायत्तता व जीवनाची पवित्रता

77. नैसर्गिक प्रणालींच्या बाबतीत त्यांना साधनमूल्य नाही ह्या धारणेला काय म्हणतात ?

(A) मानवकेंद्रवाद

(B) पर्यावरणकेंद्रवाद

(C) मानसकेंद्रवाद

(D) ईश्वरकेंद्रवाद

78. पर्यावरणाच्या नीतिशास्त्राच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?

(A) निसर्गातील विविध घटकांचे साधनमूल्य एक समान असते

(B) निसर्गातील विविध घटकांचे साधनमूल्य वेगवेगले असू शकते

(C) आर्थिक मूल्य हे साधन मूल्यापेक्षा भिन्न आहे

(D) वैज्ञानिक मूल्य हे साधनमूल्यापेक्षा भिन्न आहे

www.prepp.in



79. The primary responsibility of journalists in the context of media ethics is
(A) maximizing profits for media organizations
(B) providing unbiased and accurate information
(C) promoting sensationalism to attract viewership
(D) aligning with political ideologies

80. What role does critical thinking play in the philosophical counselling process ?
(A) it is irrelevant to philosophical counselling
(B) it helps clients question and reevaluate their beliefs and perspectives
(C) it limits open dialogue between the counsellor and the client
(D) it encourages acceptance of beliefs without scrutiny

81. Consider the following statements about the Puruṣa of Sāṅkhya system.
a. Puruṣa knows everything
b. Puruṣa is one
c. Puruṣas are many
d. Puruṣa is witness consciousness
e. Puruṣa undergoes transmigration
f. Puruṣa is inactive
Which of the above statements are true ?
(A) a, b, d
(B) c, d, f
(C) d, e, f
(D) a, b, e

79. माध्यमांच्या नीतिशास्त्राच्या संदर्भात पत्रकारांची प्राथमिक जबाबदारी असावी
(A) माध्यम संस्थांना जास्तीत जास्त नफा मिलवून देणे
(B) नि:पक्षपाती व अचूक माहीती पुरवणे
(C) दर्शकांना आकर्षित करण्यासाठी खलबल जनकतेला प्रोत्साहन देणे
(D) राजकीय विचारधारांशी जुलवून घेणे

80. तात्त्विक समुपदेशनामध्ये चिकित्सक विचाराची भूमिका कशा प्रकारची असते ?
(A) ते तात्त्विक समुपदेशनाशी असंबद्ध असते
(B) ते समुपदेशनासाठी आलेल्या व्यक्तीला तिच्या धारणा व परिप्रेक्ष्यांना तपासून पाहण्यास मदत करते
(C) समुपदेशक व समुपदेशनासाठी आलेल्या व्यक्तीमधील खुल्या संवादास ते मर्यादित करते
(D) तपासून न पाहता धारणा स्वीकारण्यासाठी ते प्रोत्साहित करते

81. सांख्यदर्शनातील 'पुरुषा' विषयीची खालील विधाने विचारात घ्या.
a. पुरुष सर्वकाही जाणतो
b. पुरुष एक आहे
c. पुरुष अनेक आहेत
d. पुरुष हे साक्षिचैतन्य आहे
e. पुरुष एका देहातून दुसऱ्या देहात जातो
f. पुरुष निष्क्रिय आहे
वरीलपैकी कोणती विधाने सत्य आहेत ?
(A) a, b, d
(B) c, d, f
(C) d, e, f
(D) a, b, e

www.prepp.in



82. According to Nyāya the conventions about word-meaning relation are

(A) Eternal, uncreated

(B) Created only by God

(C) Created only by human beings

(D) Created in some cases by God, in some cases by human beings

83. According to Advaita-Vedānta what appears in dream ?

(A) Is not real at all

(B) Belongs to the realm of reality of appearance (Pratibhāsa)

(C) Belongs to the empirical reality (Vyavahāra)

(D) Is real in ultimate sense (Paramārtha)

84. Pūrva-Mīmāṃsā system accepts the following approach to Validity (Prāmāṇya) and Invalidity (Aprāmāṇya)

(A) Intrinsic Validity and Extrinsic Invalidity

(B) Extrinsic Validity and Extrinsic Invalidity

(C) Intrinsic Validity and Intrinsic Invalidity

(D) Extrinsic Validity and Intrinsic Invalidity

85. The term anirvacanīya in Advaita-Vedānta terminology means

(A) Unreal

(B) Inexpressible in language

(C) Neither real nor unreal

(D) Indefinable

82. न्यायदर्शनानुसार शब्द-अर्थ संबंधाचे संकेत

(A) शाश्वत, अ-निर्मित आहेत

(B) फक्त ईश्वरनिर्मित आहेत

(C) फक्त मानवनिर्मित आहेत

(D) काही बाबतीत ईश्वरनिर्मित, काही बाबतीत मानवनिर्मित आहेत

83. अद्वैत वेदांतानुसार स्वप्नात जे प्रकट होते

(A) ते अजिबात सत् नसते

(B) ते प्रातिभासिक सत्तेत जमा होते

(C) ते व्यावहारिक सत्तेत जमा होते

(D) ते पारमार्थिक अर्थाने सत् असते

84. प्रामाण्य आणि अप्रामाण्याच्या बाबतीत पूर्वमीमांसादर्शन खालील दृष्टिकोनाचा स्वीकार करते

(A) स्वत: प्रामाण्य आणि परत: अप्रामाण्य

(B) परत: प्रामाण्य आणि परत: अप्रामाण्य

(C) स्वत: प्रामाण्य आणि स्वत: अप्रामाण्य

(D) परत: प्रामाण्य आणि स्वत: अप्रामाण्य

85. अद्वैत वेदांताच्या परिभाषेनुसार 'अनिर्वचनीय' या पदाचा अर्थ होतो _____.

(A) असत्

(B) जे भाषेत व्यक्त करता येणार नाही असे

(C) जे सत् ही नाही, असत् ही नाही

(D) अव्याख्येय

www.prepp.in



86. Which term is/are distributed in an 'A' proposition ?

(A) Subject term only

(B) Predicate term only

(C) Both subject term and predicate term

(D) Neither subject term nor predicate term

87. According to the traditional square of opposition, which of the following propositions must be True, if an E proposition is False ?

(A) A and I

(B) I and O

(C) A and O

(D) I only

88. Which of the following is *not* a rule of valid categorical syllogism ?

(A) Middle term must be distributed at least once in the premises

(B) From two negative premises no conclusion is drawn

(C) From two particular premises no conclusion is drawn

(D) If the term is distributed in the premises it must be distributed in the conclusion also

86. 'A' विधानात कोणते/कोणती पद/पदे व्याप्त असते/असतात ?

(A) फक्त उद्देशपद

(B) फक्त विधेयपद

(C) उद्देशपद आणि विधेयपद दोन्ही

(D) उद्देशपदही नाही किंवा विधेयपदही नाही

87. पारंपरिक विधान विरोधानुसार जर E विधान असत्य असेल तर पुढीलपैकी कोणती विधाने/विधान सत्यच असतात/असते ?

(A) A आणि I

(B) I आणि O

(C) A आणि O

(D) फक्त I

88. पुढीलपैकी कोणता वैध निरूपाधिक संविधानाचा नियम **नाही** ?

(A) मध्यपद आधारविधानांत एकदातरी व्याप्त असलेच पाहिजे

(B) दोन नकारार्थी विधानांतून कोणताच निष्कर्ष निघत नाही

(C) दोन विशेषवाची विधानांतून कोणताच निष्कर्ष निघत नाही

(D) जर एखादे पद आधारविधानात व्याप्त असेल तर निष्कर्ष विधानातही व्याप्तच असले पाहिजे

www.prepp.in



89. Recognized the rule expressed by the following argument :

$p \vee q$

$\sim p$

$\therefore q$

(A) Disjunctive syllogism

(B) Hypothetical syllogism

(C) Simplification

(D) Addition

90. Which of the following is *not* a propositional function ?

(A) Hx·Ny

(B) Ha·Na

(C) Hx ⊃ Nx

(D) Hx

91. The view justified by Kautilya is

(A) The interest of the State overrides the rules of morality

(B) The rules of morality override the interest of the State

(C) The rules of morality have no place in the State policy

(D) The king is the sole authority of the State policy

89. पुढील युक्तिवादातील नियम ओळखा :

$p \vee q$

$\sim p$

$\therefore q$

(A) वैकल्पिक संवाक्य अनुमान

(B) सोपादिक संवाक्य अनुमान

(C) सरलीकरण

(D) वृद्धिकरण

90. पुढीलपैकी कोणते विधान–फलन **नाही** ?

(A) Hx·Ny

(B) Ha·Na

(C) Hx ⊃ Nx

(D) Hx

91. कौटिल्याने समर्थन केलेले मत

(A) नैतिक नियमांपेक्षा राज्याचे हित वरचढ असते

(B) राज्याच्या हितापेक्षा नैतिक नियम वरचढ असतात

(C) राज्याच्या धोरणात नैतिक नियमांना काही स्थान नाही

(D) राजा हा राज्याच्या धोरणांचा सर्वेसर्वा असतो

www.prepp.in



92. According to Kautilya, the fourfold test for the selection of officials (Amatyas) contains

(A) Virtue, wealth, desire and fear

(B) Discipline, wealth, desire and fear

(C) Virtue, temptation, desire and fear

(D) Virtue, wealth, selflessness and fear

93. The philosophy of fundamental rights is often linked to the concept of human dignity. Which ethical principle underscores the significance of human dignity ?

(A) autonomy

(B) benevolence

(C) non-maleficence

(D) justice

94. Which of the following is true of Kautilya's theory of State ?

(A) King's relation to his subjects must be very strict

(B) King's relation to his subjects must be very lenient

(C) King is not concerned with his subjects

(D) There is no proper theory of king-subjects relation in Arthashastra

92. कौटिल्याच्या मतानुसार अमात्यांच्या निवडीसाठी असलेल्या चतुर्विध कसोटीत समाविष्ट असणारे घटक

(A) सद्‌गुण, धन, कामना व भय

(B) अनुशासन, धन, कामना व भय

(C) सद्‌गुण, मोह, कामना व भय

(D) सद्‌गुण, धन, निःस्वार्थीपणा व भय

93. मूलभूत हक्कांचे तत्त्वज्ञान हे नेहमीच व्यक्तीच्या प्रतिष्ठेच्या कल्पनेशी जोडले जाते, पुढीलपैकी कोणते नैतिक तत्त्व व्यक्तीच्या प्रतिष्ठेचे महत्त्व अधोरेखित करते ?

(A) सार्वभौमत्व

(B) परोपकार

(C) अ–हानीकारक

(D) न्याय

94. पुढीलपैकी कोणते विधान कौटिल्याच्या राज्यविषयक उपपत्तीसंदर्भात बरोबर आहे ?

(A) राजाचे प्रजेशी असणारे संबंध अत्यंत कठोर असले पाहिजेत

(B) राजाचे प्रजेशी असणारे संबंध अत्यंत मार्दवपूर्ण असले पाहिजेत

(C) राजाचा प्रजेशी काहीएक संबंध नसतो

(D) राजा–प्रजा संबंधाविषयी अर्थशास्त्रात नेमकी उपपत्ती आढळत नाही

www.prepp.in



95. Gandhi described 'Swadeshi' as

(A) only a vow

(B) only a nature's law

(C) only a duty

(D) a vow, a nature's law as well as a duty

96. The law of continuity from the highest to the lowest was established in the philosophy of

(A) Descartes

(B) Spinoza

(C) Leibnitz

(D) Locke

97. According to spinoza, every determination is

(A) Positive

(B) Real knowledge

(C) Negation

(D) Illusion

95. गांधींनी 'स्वदेशी' चे वर्णन _____ असे केले आहे.

(A) केवळ व्रत

(B) केवळ निसर्गनियम

(C) केवळ कर्तव्य

(D) व्रत, निसर्गनियम तसेच कर्तव्य

96. परमोच्च ते निम्न पर्यंतच्या सातत्याचा नियम तत्त्वज्ञानात _____ यांनी स्थापित केला.

(A) देकार्त

(B) स्पिनोझा

(C) लायब्निझ

(D) लॉक

97. स्पिनोझाप्रणित तत्त्वज्ञानाची पद्धती _____ आहे.

(A) सकारात्मक

(B) सत्य ज्ञान

(C) निषेध

(D) भ्रम

www.prepp.in



98. John Locke rejects the concept of

(A) God

(B) Innate ideas

(C) Matter

(D) Empirical knowledge

99. Berkeley rejects the abstract ideas because he believes that all ideas

(A) Are derived from sensory experience

(B) Are innate and pre existing in the mind

(C) Represent independent realities

(D) Are nothing but illusions

100. What is the basis of all motion, progress development and growth according to Hegel ?

(A) Analysis

(B) Refutation

(C) Rejection

(D) Negation

98. जॉन लॉक _____ ही संकल्पना नाकारतात.

(A) ईश्वर

(B) उपजत कल्पना

(C) भौतिक द्रव्य

(D) आनुभविक ज्ञान

99. बर्क्ले अमूर्त कल्पना नाकारतात, कारण त्यांचा असा विश्वास आहे की सर्व कल्पना

(A) इंद्रियानुभवातून उत्पन्न होतात

(B) उपजत आणि मनात पुर्वअस्तित्वात असतात

(C) स्वयंभू तत्त्वांचे प्रतिनिधित्व करतात

(D) फक्त भ्रम असतात

100. हेगेलच्या मतानुसार गती, विकास-प्रक्रिया आणि समृद्धी यांचा आधार कोणता ?

(A) विश्लेषण

(B) खंडन

(C) वर्जन


(D) नाकारणे

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



## ROUGH WORK



Prepp Your Personal Exam Guide